CC MM YY KK

दीडशिंग्या काळविटाच्या दर्शनाने पर्यटक खूश

नाशिक : दीडशिंग्या हा ममदापूर (ता. येवला) येथील संवर्धन राखीव वनामधील आकर्षणाचा केंद्रबिंदू. भरभक्कम शरीरयष्टी अन् अंगावरील रंगछटांची देणगी मिळालेले हे काळवीट पर्यटकांना न घाबरता जवळून दर्शन देत आहे. त्यामुळे पर्यटक खूष होत आहेत. राजापूर, ममदापूर हे हरणांचे गाव म्हणून ओळखले जाते. दीडशिंग्या हा या वनातील एक नर काळवीट आहे. सोनटेका टेकडी भागात दीड वर्षांपासून त्याचे दर्शन घडते. नर काळवीटबरोबर झालेल्या लढाईत त्याचे एक शिंग तुटले. त्यामुळे दीडशिंग्या अशी त्याची ओळख झाली आहे. ममदापूर संवर्धन राखीव वनाचे अधिकारी अशोक काळे यांनी दिली.

सकाळ
सातारा, गुरुवार, २८ डिसेंबर २०१७
II

• Date of Publication : गुरुवार, २८ डिसेंबर २०१७ • Posted at Market yard PSO Pune Daily. • आर.एन.आय.-एम.ए.एच.एम.ए.आर/२००३/१०६७०, रजि. नं. पी.सी.डब्ल्यू./०६९/२०१५-२०१७.

अ‍ॅग्रोवन अ‍ॅवॉर्डस्‌चे पुण्यात उद्या वितरण

स्मार्ट भूमिपुत्रांचा सहकारमंत्र्यांच्या उपस्थितीत गौरव; शेतकऱ्यांना शाबासकीची थाप

सुभाष देशमुख

पुणे, ता. २७ : मातीला श्रमाच्या सुगंधाची जोड देऊन कर्तृत्वाचा मळा फुलवणाऱ्या महाराष्ट्रातील बहादर शेतकऱ्यांचा शुक्रवारी (२९ डिसेंबर) अ‍ॅग्रोवन स्मार्ट अ‍ॅवॉर्डस् देऊन गौरव करण्यात येणार आहे. सहकारमंत्री सुभाष देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या सोहळ्यात विविध वर्गवारीत निवडण्यात आलेल्या ११ शेतकऱ्यांचा सन्मान केला जाईल. पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात दुपारी ४ वाजता आयोजित केलेल्या विशेष सोहळ्यात 'अ‍ॅग्रोवनच्या'वतीने स्मार्ट शेतकऱ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली जाईल.

अ‍ॅग्रोवन स्मार्ट अ‍ॅवॉर्डस् सोहळा

- **तारीख : २९ डिसेंबर**
- **स्थळ : टिळक स्मारक मंदिर, टिळक रोड, पुणे**
- **वेळ : सायंकाळी ४ ते ७ वाजता**

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश मिळवलेल्या शेतकऱ्यांच्या कर्तृत्वाची दखल घेतली जावी आणि इतर शेतकऱ्यांना त्यांच्यापासून प्रेरणा मिळावी, या हेतूने हे पुरस्कार दिले जातात. या उपक्रमासाठी सोनाई कॅटल फिड्स, यूपीएल, जैन इरिगेशन सिस्टिम्स लि, स्मार्टकेम फर्टिलायझर्स लि., बँक ऑफ महाराष्ट्र, ओरिएंटल इन्शुरन्स, चौधरी यात्रा कंपनी प्रा. लि यांचे प्रायोजकत्व लाभले आहे.

राज्यस्तरीय सहा व विभागीय पाच अशा एकूण अकरा गटांमध्ये हे पुरस्कार दिले जातील. पुरस्कारांसाठी राज्यभरातील शेतकऱ्यांमधून मोठा प्रतिसाद मिळाला. त्रयस्थ निवड समितीने त्यातून अकरा विजेत्यांची निवड केली आहे. यापैकी १० पुरस्कार विजेत्यांच्या नावांची घोषणा तसेच त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय 'अ‍ॅग्रोवन'मधून आजअखेर करून दिला आहे. अ‍ॅग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी या मुख्य पुरस्काराची घोषणा मात्र २९ डिसेंबरच्या मुख्य सोहळ्यात केली जाईल. कृषी आणि ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविणारा मनोरंजनाचा विशेष कार्यक्रम या प्रसंगी सादर होणार आहे.

'अ‍ॅग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी' पुरस्कार मिळवणाऱ्या शेतकऱ्याला एक लाख रुपये देऊन गौरविण्यात येणार आहे. 'अ‍ॅग्रोवन प्रेरणा' आणि 'अ‍ॅग्रोवन स्मार्ट महिला शेतकरी' पुरस्काराची रक्कम प्रत्येकी २५ हजार रुपये आहे, तर विभागीय पातळीवरील 'स्मार्ट शेतकरी' पुरस्कार तसेच सेंद्रिय शेती, कृषिपूरक व्यवसाय, कृषी उद्योजक पुरस्कार प्रत्येकी १० हजार रुपयांचा आहे. सर्व पुरस्कारार्थींना सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्हही दिले जाणार आहे.

शेतकऱ्यांना लुटणाऱ्यांचा बंदोबस्त करू : फुंडकर

भाऊसाहेब फुंडकर

अकोला, ता. २७ : ''काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस सरकारच्या काळातच कापसावर बोंड अळीचा उद्रेक वाढला होता. तेव्हा या सरकारने त्याकडे दुर्लक्ष केल्यानेच मॉन्सटो, महिको कंपन्यांनी बनावट वाण देऊन शेतकऱ्यांना लुटणे सुरूच ठेवले. पण, राज्यात भाजपची सत्ता आल्यावर शेतकऱ्यांना लुटणाऱ्यांचा बंदोबस्त करण्यास आम्ही सुरवात केली, असे राज्याचे कृषिमंत्री भाऊसाहेब फुंडकर यांनी सांगितले. अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात बुधवारी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या उद्‌घाटन कार्यक्रमात ते बोलत होते.

दृष्टिक्षेपात

हुक्का पार्लर बंदीसाठी मुंबईचे महापौर आग्रही

मुंबई, ता. २७ : हुक्का पार्लरमुळे मुंबईतील तरुण पिढी मादक पदार्थांच्या आहारी जात आहे. त्यामुळे त्यावर त्वरित बंदी घालावी, अशी मागणी महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांनी पोलिस आयुक्त दत्ता पडसलगीकर यांच्याकडे केली. त्यांच्या या मागणीस सकारात्मक प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे. गुन्हेगार आणि समाजकंटकाचा हुक्का पार्लरमध्ये मोठ्या प्रमाणात वावर असतो. दुर्दैवाने तरुण पिढी या पार्लरकडे आकर्षित झालेली आहे. ही समाजस्वास्थाच्या दृष्टीने गंभीर बाब असल्याची भीती महापौरांनी व्यक्त केली. गोरेगावमधील एका हुक्का पार्लरमध्ये एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याचा खून झाला होता.

उमेदवारांच्या जीपला अपघात; एक ठार

नेकनूर (ता. बीड), ता. २७ : ग्रामपंचायत निवडणुकीचा निकाल ऐकण्यासाठी बीडकडे निघालेल्या उमेदवारांच्या जीपला अपघात होऊन नेकनूर ग्रामपंचायतीच्या सरपंचांचे बंधू शेख वशिद अन्वर (वय ३४) यांचा मृत्यू झाला, तर सात जण जखमी झाल्याची घटना बुधवारी घडली. नेकनूर ग्रामपंचायतीसाठी मंगळवारी (ता. २६) मतदान झाले. बीड तहसील कार्यालयात आज मतमोजणी होती. यासाठी सकाळी निकाल ऐकण्यासाठी सरपंच शेख अर्शद अन्वर, बंधू शेख वशिद व सदस्यपदाचे काही उमेदवार जीपमधून बीडकडे निघाले होते.

धारूर तालुक्यामध्ये शेतकरी आत्महत्या

सिरसाळा, ता. २७ : खामगाव (ता. धारूर, जि. बीड) येथील शेतकरी प्रल्हाद तुकाराम बडे (वय ६०) यांनी शेतात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी (ता. २६) घडली. नापिकी, कापसावर पडलेली बोंडअळीमुळे यामुळे त्यांना नैराश्य आले होत. त्यांच्यावर सुमारे एक लाख रुपयांचे कर्ज होते. हे कर्ज फेडण्याच्या विवंचनेतून त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी सिरसाळा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

सोशल साइटवरून तरुणीला हजारोंचा गंडा

खोपोली, ता. २७ : विवाह नोंदणी करणाऱ्या सोशल साइटवर तरुणाचे प्रोफाईल बनविलेल्या व्यक्तीने खोपोलीतील २८ वर्षीय तरुणीशी लग्नाची बोलणी करून तिला ३७ हजार रुपयांचा ऑनलाइन गंडा घातला आहे. याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

'टायगर'ची प्रतीक्षा...

मुंबई : बॉलीवूडचा 'दबंग'स्टार सलमान खान याच्या वाढदिवशी त्याची एखादी झलक पाहण्यासाठी चाहत्यांनी बुधवारी वांद्रे येथील निवासस्थानाबाहेर केलेली गर्दी.

काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदासाठी सातव यांच्या नावाची चर्चा

राजीव सातव

मुंबई, ता. २७ : काँग्रेस अध्यक्षपदी राहुल गांधी यांची नियुक्ती झाल्यानंतर पक्षामध्ये बदलाचे वारे वाहू लागले आहे. विशेषत: तरुण रक्ताला पक्षसंघटनेत वाव देण्याचा विचार पुढे आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी खासदार राजीव सातव यांच्या नावाची चर्चा सुरू झाली आहे.

लोकसभेच्या २०१४ मधील निवडणुकीत अशोक चव्हाण आणि राजीव सातव खासदार झाले. मात्र, त्यानंतर विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला पराभव पत्करावा लागला. त्यामुळे काँग्रेसला नवसंजीवनी देण्यासाठी संघटनात्मक पातळीवर पुढील काळात मोठे बदल केले जाणार आहेत. यामध्ये ज्येष्ठ नेत्यांना त्यांच्या पदांचा राजीनामा द्यावा लागणार आहे. गुजरात निवडणुकीत काँग्रेसला चांगले यश मिळाले आहे. त्यानंतर राहुल गांधी यांची पक्षाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यामुळे राहुल गांधी यांचे निकटवर्तीय असलेले सातव यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड होईल, अशी चर्चा आहे. सातव हे वादापासून दूर असून, ते पक्षाचा ओबीसी चेहरा म्हणूनही परिचित आहेत.

विदर्भातील शेतकरी आणि ओबीसी समाजाचे नेते नाना पटोले यांनी भाजपला राम राम केला आहे. ते काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची दाट शक्यता आहे.

जाळपोळ केल्याने आमदार बोंद्रेंना अटक

चिखली, ता. २७ : वीज वितरण कार्यालयात जाळपोळ केल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आमदार राहुल बोंद्रे यांच्यासह नऊ जणांना बुधवारी अटक केली.

तालुक्यातील केळवद परिसरातील शेतकऱ्यांचा वीजपुरवठा वीज वितरण कंपनीने खंडित केला होता. त्यामुळे आमदार राहुल बोंद्रे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी केळवद येथील वीज वितरणच्या कार्यालयात गेले होते. तेथे आक्रमक झालेल्या जमावाने साहित्याची जाळपोळ केली होती. पोलिसांनी आमदार राहुल बोंद्रे यांना त्यांच्या राहत्या घरातून ताब्यात घेत चिखली न्यायालयात हजर केले आहे. आमदार बोंद्रे यांना अटक करण्यात आल्याचे समजताच त्यांच्या समर्थकांसह नागरिकांनी परिसरात मोठी गर्दी केली होती. त्यामुळे मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

गो विज्ञानाने करा प्रगत शेती : भटकर

विजय भटकर

नाशिक, ता. २७ : दिवसेंदिवस देशातील पीक क्षेत्रात घट होत असल्याने शेती उत्पादनात घट येत आहे. मात्र, देशाच्या एकशेतीस कोटी जनतेला पोसणारे ते एकमेव क्षेत्र असून, शेतकरी जगला तर जग जगेल. देशात हरितक्रांतीमुळे अनेक चांगल्या गोष्टी घडल्या; परंतु दुर्दैवाने वेगवेगळ्या रसायनांच्या वापराने आपले अन्न आज विषमय बनले असून, गो विज्ञान जाणून घेत त्याच्या साहाय्याने प्रगत शेती करा, असा सल्ला ज्येष्ठ संगणक तज्ज्ञ, नालंदा विद्यापीठाचे कुलपती, पद्‌भूषण डॉ. विजय भटकर यांनी आज दिला.

जय किसान फार्मर्स फोरमतर्फे देशाचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख जयंतीचे औचित्य साधत आज दुपारी गंगापूर रोडवरील रावसाहेब थोरात सभागृहात राज्यातील चाळीस शेतकऱ्यांना सपत्निक कृषिरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भटकर होते. उद्‌घाटक म्हणून राजस्थानचे पशुसंवर्धनमंत्री जगमोहन बघेल, तर प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय कृषी शास्त्रज्ञ डॉ. रमेश ठाकरे आदी उपस्थित होते.

स्वातंत्र्यानंतर देशाने कृषी क्षेत्रासह ऑटोमोबाइल्ससह अनेक क्षेत्रांत भरीव प्रगती केली. परंतु देशाचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांनी कृषी क्षेत्राला खऱ्या अर्थाने भरभराटीला आणले. आज शेतकी उत्पादनात जगात भारताचा तिसरा क्रमांक लागतो, असे डॉ. भटकर म्हणाले. रासायनिक शेतीने आज आपले अन्न विषमय झाले असून, ते टाळण्यासाठी गाईच्या मागे दडलेले विज्ञान समजून घेत गो विज्ञानाने शेती करा, असा सल्ला त्यांनी शेवटी दिला.

या वेळी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सुनील बाऱ्हाते, कांतीलाल नाळे, रामनाथ निरभवणे, मच्छिंद्र पवार, बाळासाहेब माळी, लक्ष्मण वाघ आदी चाळीस शेतकऱ्यांचा सपत्निक कृषिरत्न पुरस्काराने गौरव करण्यात आला.

भूलतज्ज्ञामुळे वाचले दुचाकीस्वाराचे प्राण

नाशिक, ता. २७ : मुंबई-आग्रा महामार्गावरील अमृतधाम परिसरात दुचाकीच्या अपघातात एक युवक जखमी झाला. चेहऱ्याला गंभीर मार लागल्याने अतिरक्तस्राव होऊन तोंडावाटे रक्त फुप्फुसात जात होते. कळवण उपजिल्हा रुग्णालयाचे भूलतज्ज्ञ डॉ. सुहास कोटक हे येथून जात होते. अपघात झाल्याचे पाहून ते थांबले. त्यांनी कृत्रिम ऑक्सिजन यंत्राचा वापर करून प्राथमिक उपचार सुरू केले. तोंडावाटे फुप्फुसात जाणारे रक्त रोखल्यामुळे त्या युवकाचे प्राण वाचले. युवकाची ओळख पटलेली नाही.

चिखलठाण : जेऊर (ता. करमाळा) येथील प्रवीण बलदोटा यांनी तयार केलेल्या यंत्राच्या साह्याने हरभरा खुडताना शेतकरी.

टाकाऊपासून बनवले भाजी खुडणारे यंत्र

जेऊरमधील शेतकऱ्याची कामगिरी

चिखलठाण, ता. २७ : घरातील जुन्या टाकाऊ वस्तूंचा वापर करून जेऊर (ता. करमाळा) येथील प्रवीणकुमार बलदोटा या शेतकऱ्याने हरभऱ्याची भाजी खुडण्याचे यंत्र तयार केले आहे. या यंत्रापासून एका दिवसात चार ते पाच एकरांवरील हरभऱ्याचे शेंडे खुडले जात आहेत. हे यंत्र करण्यासाठी फक्त ४०० रुपये खर्च आला आहे.

बलदोटा यांची जेऊर गावालगत शेतजमीन असून, त्यात सात एकर क्षेत्रावर हरभरा आहे. हरभरा फुलोऱ्यात येण्यापूर्वी शेंडे खुडल्यास नवीन जादा तगारे फुटून जादा घाटे लागतात व पीक जोमदार येते. त्यातून उत्पन्नात वाढ होते. शेंडे खुडण्याच्या कामासाठी ते मजूर शोधत होते. दोनशे रुपये मजुरी देऊनही मजूर मिळत नाहीत. त्यामुळे हे काम मजुरांऐवजी यंत्राद्वारे करता येईल का, असा विचार बलदोटा यांच्या मनात आला. 'सकाळ अ‍ॅग्रोवन'मध्ये एकदा अशा प्रकारच्या यंत्राविषयी वाचल्याचे त्यांचे सहकारी सुभाष इंगोले यांनी त्यांना सांगितले. त्यानंतर दोघांनी विचार करून हे छोटेसे यंत्र तयार केले.

घरातील जुन्या सीडी प्लेअरची मोटर जोडून त्याच्यावर बुशिंग टाकून त्यात दोन ब्लेडची पाती बसवली. एका पीव्हीसी पाइपवर त्याची असेंब्ली करण्यात आली. संगणकाच्या जुन्या बॅटरीच्या साह्याने ती पाती फिरवून हरभऱ्याचे शेंडे खुडण्याचे यंत्र बनवले. त्याची चाचणीही यशस्वी झाली. आता ३० महिला मजुरांचे एका दिवसात होणारे काम हे छोटेसे यंत्र एका दिवसात करत आहे. बलदोटा यांच्या या यंत्रामुळे हरभरा खुडण्याचे काम सुखकर झाले आहेच. शिवाय मजुरीच्या खर्चातही मोठ्या प्रमाणावर बचत होत आहे.

अध्यक्ष साधणार सामान्यांबरोबर संवाद

साहित्यिक वाचकांसाठी साहित्यनिर्मिती करतात; परंतु या वाचकांना साहित्य संमेलनात औपचारिकपणा, वाचकांचा भिडस्तपणा यामुळे संवाद होत नाही. यंदा साहित्य संमेलनात सर्वसामान्य माणसांना संमेलनाध्यक्षांशी बोलण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे अधिक आनंद आहे.

– **लक्ष्मीकांत देशमुख,** नियोजित संमेलनाध्यक्ष

मुंबई, ता. २७ : अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष नेमका काय विचार करतात, काय वाचतात, त्यांना कसे सुचते, असे नानाविविध प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात असतात; पण संमेलनाच्या धामधुमीत ते प्रश्न अध्यक्षांपर्यंत पोचत नाहीत. ही अडचण लक्षात घेऊन यंदा पहिल्यांदाच साहित्य संमेलनाध्यक्षांबरोबर संवाद साधण्याची सर्वसामान्यांना संधी मिळणार आहे.

बडोदा येथे फेब्रुवारीमध्ये ९१वे अखिल भारतीय साहित्य संमेलन होणार आहे. माजी सनदी अधिकारी आणि साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख यंदाचे संमेलनाध्यक्ष आहेत. त्यांच्यासह संमेलनातील मान्यवरांशी गप्पा मारण्याची, त्यांचे अनुभव आणि विचार ऐकण्याची सर्वसामान्यांची इच्छा यंदा पूर्ण होणार आहे. त्यासाठी विशेष सत्र ठेवण्याचा आयोजकांचा विचार आहे.

आगेप्रकरणी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करू : आठवले

मुंबई, ता. २७ : नितीन आगेच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा व्हावी आणि आगे कुटुंबीयांना पोलिस संरक्षण मिळावे यासाठी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करू, असे आश्वासन आगेच्या कुटुंबीयांना केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिले आहे. तसेच या प्रकरणातील फितूर झालेल्या साक्षीदारांवर कारवाई झाली पाहिजे, यासाठीही प्रयत्न करणार असल्याचे आठवलेंनी सांगितले.

नितीन आगेचे वडील राजू आगेंनी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची भेट घेऊन नितीन आगेला न्याय मिळवून देण्याची मागणी केली. राजू आगे यांच्या कुटुंबाला खर्डा गावात धोका आहे. त्यांना पोलिस संरक्षण देण्यात यावे. तसेच आत्मसंरक्षणासाठी शस्त्र परवाना देण्यात यावा, अशी तसेच आर्थिक स्थिती बिकट असल्याने समाजाने पाठबळ देण्याची मागणी केली.

ऊस तोडला; पण शिक्षण सोडले नाही!

उद्योजक डॉ. अशोक खाडे यांनी सोमेश्वरनगरला विद्यार्थ्यांपुढे उलगडला शालेय जीवनातील संघर्ष

सोमेश्वरनगर (जि. पुणे), ता. २७ : ''जन्म झाला तेव्हा शेकायचीपण सोय नव्हती. फाटकी कपडे घालून खर्डा-भाकरी खात शिकलो. दहावीच्या परीक्षेला शिक्षकांनीच कपडे घेऊन दिली. आईसोबत भांगलायला, ऊस तोडायला जायचो. तरीही जिद्दीनं शिकत होतो; कारण आईला फाटक्या लुगड्यात बघू शकत नव्हतो. परिस्थितीच्या बरगड्या लवकरात लवकर मोडल्या पाहिजेत, हे मनाशी पक्कं होतं,'' अशा शब्दांत 'दास ऑफशोर' कंपनीचे मालक डॉ. अशोक खाडे यांनी आपला शालेय जीवनातील संघर्ष विद्यार्थ्यांसमोर मांडला.

सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ आणि भारत ज्ञान-विज्ञान समुदाय संघटना यांच्या वतीने आयोजित करिअर मार्गदर्शन शिबिरात डॉ. खाडे यांची प्रा. अजय दरेकर यांनी प्रकट मुलाखत घेतली. डॉ. खाडे म्हणाले, ''गरिबीने आईचे बेकार हाल झाले. वडील सांगायचे, दुष्काळ मी घेऊन आलेलो नाही. गाडगी-मडकी मोडू; पण शिकायची काळजी कर.'' मलाही तुमच्यासारखी स्वप्न पडायची; पण माझ्या आईचीच स्वप्नं पूर्ण करण्याची जिद्द होती. दहावीच्या पहिल्या पेपरला सरांनी ड्रेस शिवून दिला. शेवटच्या पेपरपर्यंत तोच वापरला. दहावीत पहिला आलो. नंतर इंजिनिअर होऊन चांगल्या नोकरीला लागलो. जर्मनीला विमानाने पहिल्यांदा निघालो, तेव्हा टाय आणि कोट नव्हता. आता लाखात पगार घेणारे दीडशे इंजिनिअर आणि एकूण तीन हजार माणसं माझ्याकडे आहेत.''

''समुद्राखालील खोल विहिरीतून तेल काढणारी सामग्री माझ्याकडे आहे. दुबईचे राजे शेख महंमद बिन खलिफा माझे पार्टनर आहेत; पण त्यांच्या राजवाड्यात खर्डाच खातो. तुम्हीही मोठे झालात तर घर व गावही सुधारा. मराठी माणूस आळंदी-पंढरपूर आणि दर महिन्याचे सण, श्रावण, दिवाळी, लग्न याबाबत जास्तच जागरूक असल्याने तो उद्योगात मागे आहे. धंदा करण्यासाठी धीर, प्रामाणिकपणा, कौशल्य, नेतृत्वक्षमता, नम्रता लागते,'' असेही त्यांनी सांगितले.

सोमेश्वरनगर (ता. बारामती) : मुलाखतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपुढे आपल्या जीवनातील संघर्ष उलगडून दाखविताना उद्योजक डॉ. अशोक खाडे.

नाशिक शस्त्रसाठा प्रकरण

मुख्य आरोपीचे वडील अटकेत

मुंबई, ता. २७ : पाच लाखांच्या खंडणीप्रकरणी गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाने अकबर पाशा या व्यक्तीला बुधवारी अटक केली. नाशिक येथे जप्त केलेल्या शस्त्रसाठा प्रकरणातील मुख्य आरोपी बद्रीजुम्मन अकबर बादशाह ऊर्फ सुका ऊर्फ पाशा हा अकबरचा मुलगा आहे. रफी किडवाई मार्ग पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या या गुन्ह्यामध्ये सुका पाशालाही सहआरोपी केले आहे.

अकबर पाशा याचीही गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. एका व्यावसायिकाला खंडणीसाठी धमकावल्याप्रकरणी गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्याला अटक केली आहे. या गुन्ह्यांमुळे सुकाविरोधात 'मोक्का'नुसार गुन्हा दाखल करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दहशत बसवण्यासाठी सुका आणि अकबर याने एका व्यक्तीला खंडणीसाठी धमकावले होते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ऑक्टोबरमध्ये पहिल्यांदा या व्यक्तीकडे पाच लाखांची मागणी करण्यात आली. अकबर व पाशा या दोघांवरही अनेक गुन्हेगारी गुन्हे दाखल आहेत, त्यामुळे त्यासाठी होणारा खर्च भागवण्यासाठी ही रक्कम मागवण्यात आली होती.

CC MM YY KK